महाराष्ट्र शासन
नगर रचना आणि मूल्यनिर्धारण विभाग
तळमजला, मध्यवर्ती कार्यालये, पुणे ४११००१

दूरध्वनी क्र.०२०-२६१२२०७६

Email: ddtpho_pune@rediffmail.com
ddtp.ho@maharashtra.gov.in

---

## -: प्रसिध्दीपत्रक :-

नगर रचना आणि मूल्यनिर्धारण विभागाच्या आस्थापनेवरील उच्चश्रेणी लघुलेखक व निम्नश्रेणी लघुलेखक (गट-ब / अराजपत्रित) संवर्गातील रिक्त पदे सरळसेवा प्रवेशाने भरणेबाबतची प्रक्रिया संचालनालयाच्या स्तरावर सुरु आहे. उच्चश्रेणी लघुलेखक व निम्नश्रेणी लघुलेखक (गट-ब / अराजपत्रित) या पदांच्या सदरहू ऑनलाईन परीक्षेच्या प्राप्त निकालानुषंगाने व्यावसायिक चाचणी परिक्षेसाठी पात्र झालेल्या उमेदवारांची व्यावसायिक कौशल्य चाचणी परीक्षा दि.१७.०८.२०२५ रोजी पार पडली आहे.

०२. त्यानुषंगाने व्यावसायिक चाचणी परीक्षेचा निकाल संचालनालयास प्राप्त झाला असून, सदरहू प्राप्त निकालानुषंगाने जे उमेदवार व्यावसायिक चाचणी परीक्षेमध्ये अपात्र ठरले आहेत, अशा उमेदवारांची यादी नगर रचना संचालनालयाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येत आहे.

०३. उच्चश्रेणी लघुलेखक व निम्नश्रेणी लघुलेखक या पदाची व्यावसायिक चाचणी परीक्षा दि.१७.०८.२०२५ रोजी पार पडलेली असून, सदरहू दोन्ही पदाच्या व्यावसायिक चाचणी परीक्षेस अनुपस्थित असलेल्या उमेदवारांची यादी नगर रचना संचालनालयाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येत आहे.

०४. त्याचप्रमाणे उच्चश्रेणी लघुलेखक व निम्नश्रेणी लघुलेखक या पदासाठी टि.सी.एस. मार्फत घेण्यात आलेल्या ऑनलाईन परीक्षेत व व्यावसायिक चाचणी परीक्षेत प्राप्त गुण एकत्रित करुन पात्र झालेल्या उमेदवारांची यादी स्वतंत्रपणे नगर रचना संचालनालयाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येईल.

( महेंद्र परदेशी )
सदस्य सचिव,
राज्यस्तरीय निवड समिती, पुणे.
तथा,
उपसंचालक,नगर रचना,
मुख्य कार्यालय, पुणे.

( जितेंद्र ल.भोपळे )
अध्यक्ष,
राज्यस्तरीय निवड समिती, पुणे.
तथा
संचालक, नगर रचना,
महाराष्ट्र राज्य, पुणे.